
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय दुसरा

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

# श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604



©श्री विजय पांढरे(२०१२)


**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**


प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नम: ||

## अध्याय दुसरा

# सांख्ययोग

संजय म्हणे धृतराष्टाला । बघ शोकाकुल पार्थ जाहला । प्राप्त होऊन रुदनाला । बैसला तेथे ||१||
रणी कुळ देखोनी समस्त । मोह उपजला अद्‌भुत । तेणे द्रवले तयाचे चित्त । अतोनात ||२||
मीठ विरघळावे पाण्यात । वा वाऱ्यासवे ढग जसे जातात । तैसा असूनही धीरोदत्त । गोंधळला अर्जुन ||३||
तैसा मोहाने ग्रासला । दिसे अति कोमेजला । चिखलात जसा रुतला । राजहंस ||४||
तैसा तो पांडुकुमार । मोहाने अति जर्जर । तयासी मग सारंगधर । बोलता झाला ||५||

श्री भगवानुवाच

हे अर्जुना सजग होई । ऐसे वागणे उचित नाही । आता या युद्ध समयी । सावध हो ||६||
सांग काय तुज जाहले । काय तुज चित्ती उपजले । अनिष्ट लक्षण का प्रकटले । आज येथे ||७||
तू अनुचित कधी न वागतो । धीर कधीच न सोडतो । म्हणून तुज पराभव तो । ठाऊक नाही ||८||
तू वीरवृत्तीचे आश्रयस्थान । क्षत्रियांत अति महान । तुझ्या पराक्रमाचे गुणगान । तिन्ही लोकी ||९||
तू युद्धी शंकरासी जिंकले । निवातकवचास नष्ट केले । गंधर्वांनाही हरविले । युद्धी तू ||१०||
ऐसी तुझी महानता । त्रैलोक्यही थोकडे पहातां । अजिंक्य तुझी पराक्रमता । तिन्ही लोकी ||११||
तू वीर महान । त्या पराक्रमा सोडून । खाली तोंड करून । रडतोस काय ||१२||
पाहून ते स्वजन । मोहाने झालास दीन । सूर्यास का अंधारानं । गिळले कधी ||१३||
वाऱ्यास ढगाची का भीती वाटते । अमृत का कधी मरण पावते । सरपण का कधी गिळते । सांग अग्नी ||१४||
पाणी मिठात का विरघळते । विषास का विषबाधा होते । बेडूक का गिळे सर्पाते । सांग मजला ||१५||
कोल्ह्यास सिंह घाबरला । ऐसा प्रसंगच न घडला । परि तुवा तो साच केला । आज येथे ||१६||
म्हणुनी अर्जुना आता । चित्त न द्यावे अनुचिता । मनी धरून ती धीरता । हो सावध ||१७||
सोडून त्या मोहांना । घे हाती धनुष्यबाणा । विसरून ती करुणा । लढ आता ||१८||
अर्जुना तू जाणता । बा विचार कर आता । युद्धी अशी कारुण्यता । योग्य नाही ||१९||
अयोग्य तुझे वागणे । मग स्वर्गास ते मुकणे । ऐसे श्रीकृष्ण तो म्हणे । अर्जुनासी ||२०||
म्हणून शोक तो आवर । मनी धरून धीर । मोह तो अव्हेर । अर्जुना आता ||२१||
असा काय रडतोस । मुकशील त्या कीर्तीस । स्वत:च्या त्या हितास । जप अर्जुना ||२२||
आज या युद्ध क्षणा । न उपयोगी कृपाळूपणा । उपजला कैसा दुर्बलपणा । आज येथे ||२३||
सर्व माहीत होते तुला । तू ओळखतोस सर्वाला । मग बाऊ कां केला । युद्धाचा आज ||२४||
युद्ध हे आजचे । काय नवल त्याचे । वैर तुम्हा एकमेकांचे । जन्मापासून ||२५||
मग आता काय झाले । कारुण्य का प्रकटले । दौर्बल्य का उपजले । तुजठायी ||२६||
मोह धरता काय होईल । असलेली प्रतिष्ठाही जाईल । परलोकही गमावशील । इहलोकासह ||२७||
मन प्राप्त झाले दुबळेपणाला । न शोभे हे क्षत्रियाला । मग या संग्रामाला । जिंकशील कैसा ||२८||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसा तो कृपावंत। नानापरि असे समजावीत। ते ऐकोनी पंडुसुत। काय बोले ॥२९॥

अर्जुन उवाच

देवा बोललास तू विस्ताराने। परि अनावश्यक ते बोलणे। आप्तांसी युद्ध ते करणे। अविचार ॥३०॥
युद्ध हा प्रमाद खास। आम्ही झाल्याने प्रवृत्त युद्धास। होईल बघ वंशनाश। आज येथे ॥३१॥
बघ वडीलधाऱ्या पूजावे। मग संतोषास पावावे। तयांनाच कसे मारावे। युद्धी आज ॥३२॥
संतवृंदा नमस्कार करणे। तयांचे पूजनही घडणे। हे सोडून तया मारणे। अयोग्य देवा ॥३३॥
वंदनीय गुरू आमचे। पूजन करतो मी तयांचे। मज मनी भीष्मद्रोणाचे। प्रेम बहू ॥३४॥
जयासी नाही माझे वैर। स्वप्नीही नसे तो विचार। तयावर करू कसा वार। देवा आता ॥३५॥
जळो लढणे लाजिरवाणे। गुरूजनास ठार करणे । तया मारून मिरवणे। पाप देवा ॥३६॥
द्रोणाचार्यांनी मज घडविला। धनुर्वेद तो शिकविला। मी उपकराखाली दबलेला। त्यांच्या देवा ॥३७॥
जयांनी दिधले वरदान। तयांनाच कसे देऊ मरण। ते भस्मासुराचे आचरण। होईल देवा ॥३८॥
देवा समुद्र दिसतो गंभीर। परि क्षुब्ध तयाचे अंतर। परि द्रोणाचार्य स्थिर। आंत बाहेरी ॥३९॥
अपार हे गगन। शक्य तयासही मोजणं। हृदय त्याहूनही अतिगहन। त्या द्रोणांचे ॥४०॥
अमृतही विटिजे। वा वज्रही फुटीजे। परि विकार न उपजे। द्रोण चित्ती ॥४१॥
स्नेहाबाबत ती माय। ती सर्वश्रेष्ठ होय। जशी दुधावरची साय। ते द्रोणचित्त ॥४२॥
हा कारुण्याची मूर्ती। सकळ गुणांची कीर्ती। सागरासारखी व्याप्ती। प्रेमाची यांच्या ॥४३॥
द्रोणाचार्य महान। अतिकृपाळू दयावान। मग मी त्यांचे ते मरण। कैसे चिंतू ॥४४॥
तयांना रणी मारावे। मग राज्यसुख भोगावे। ते मनी नच ये आघवे । माझ्या भगवंता ॥४५॥
तयांना ते मारणं। मग राज्य सुख भोगणं। त्या परि भिक्षा ती मागणं। पसंत मजला ॥४६॥
देशत्याग तो करीन। गिरीकंदरी जाऊन राहीन। त्या द्रोणांवर शस्त्र उगारणं। पाप देवा ॥४७॥
टोकदार त्या बाणाने। या गुरुजना मारणे। मग कैसे भोग भोगणे। जे रक्तरंजित ॥४८॥
ऐसे भोग रक्तरंजित। आम्ही कैसे भोगावेत। माझ्या मना नाही पटत। हत्या तयांची ॥४९॥
अर्जुन म्हणाला श्रीकृष्णा। देवा तू ऐकतोस ना। तरी भगवंत लक्ष देईच ना। अर्जुनाकडे ॥५०॥
ते जाणून पार्थ घाबरला। मग पुन्हा बोलू लागला। लक्ष दे माझ्या या बोला। भगवंता तू ॥५१॥
येरवी माझ्या चित्ती जे होते। ते मी बोललो येथे। परि काय असे योग्य ते। जाणता तुम्ही ॥५२॥
वैर यांच्याशी धरावे। त्या परि प्राण ते सोडावे। कैसे ते युद्ध करावे। गुरुजनांशी देवा ॥५३॥
आता यांना रणीं मारावे। की युद्ध सोडून जावे। काय दोहोंमाजी बरवे। कळेना मजला ॥५४॥
काय असे ते उचित। मजला नाही ते सुचत। व्याकूळ बघ माझे चित्त। मोहाकारणे ॥५५॥
जेव्हा डोळ्यांस अंधारी येते। मग दृष्टी ती लोपते। मग काहीच ना दिसते। डोळ्यांमाजी ॥५६॥
देवा मज तैसे जाहले। मन हे भ्रांतीने ग्रासले। आता काय हित आपुले। न जाणे मी ॥५७॥
भगवंता तू जाणता। विचार करून पुरता। सांग आम्हांस आता। काय बरवे ॥५८॥
तू गुरु बंधू नि पिता। तूच इष्ट देवता। आम्हांस वाचव आता। संकटातून या ॥५९॥
पहा शिष्याते गुरुवर। नच कधी करती अव्हेर। त्यागतो का नद्यांना सागर। देवा कधी ॥६०॥
जर अपत्यास माय। सोडूनी ती जाय। तर ते जगेल तरी काय। सांगा देवा ॥६१॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आम्हा सर्वांस आधार । देवा तूच एक परमेश्वर । कर आम्हांवर उपकार । देवा आता ॥६२॥
काय आम्हा उचित । सांग देवा ते त्वरित । कठीण या युद्ध प्रसंगात । तार आम्हां ॥६३॥
हे सकळ कुळ देखोनी । शोक उपजलासे मनी । तो तुझ्या वाक्यावाचुनी । जाईच ना ॥६४॥
पृथ्वीचे राज्य प्राप्त होईल । इंद्रपद तेही मिळेल । परि मोह न जाईल । मनीचा हा ॥६५॥
जैसे बीज सर्वथा भाजले । सुपीक जमिनीत पेरले । जरी तयासी सिंचले । तरी उगवेचना ॥६६॥
जर आयुष्यच सरले असे । मग औषधी उपयोगी नसे । फक्त त्यास तारत असे । परमामृत ॥६७॥
ही जी राजभोग समृद्धी । ती वाढवी जीवबुद्धी । तुझा कटाक्ष तो कृपानिधी । वाचवेन मजला ॥६८॥
ऐसे अर्जुन तेथ बोलिला । क्षण एक भ्रांती सांडिला । मग पुन्हा व्यापिला । भ्रांतीने त्या ॥६९॥
ही शोकाची ऊर्मी नसे । हे काही वेगळेच भासे । महामोहे ग्रासीला असे । काळसर्पे ॥७०॥
कारुण्य ते उपजून । वर्मी दंश होऊन । मोहविषाने ग्रासून । बेहोषीले त्यासी ॥७१॥
जाणून प्रसंगाचे गंभीरपण । धावूनी आला भगवान । करण्या विषहरण । गारुडी जैसा ॥७२॥
अर्जुन अति व्याकूळ । कृष्णही होता तो जवळ । आता प्रकटवून आपले कृपाबल । रक्षील त्यासी ॥७३॥
ऐसा तो पार्थ । जो अत्यंत मोहग्रस्त । अडकला होता मोहात । भ्रांतीकारणे ॥७४॥
फाल्गुन त्या मासी । ढग जसे झाकती सूर्यासी । तैसे कवळले होते अर्जुनासी । त्या भ्रांतीने ॥७५॥
तैसा भ्रांतीने तो धनुर्धर । जाहला होता दु:ख जर्जर । जैसा उन्हाळ्यात डोंगर । जाळी वणवा ॥७६॥
मग तो सुनील । जो कृपामृत सुजल । वळला तो श्रीगोपाल । अर्जुनाकडे ॥७७॥
सुदर्शन असे हाती । जशा विद्युल्लता चमकती । आणि गंभीर वाचा ती । भगवंताची ॥७८॥
आता तो उदार कैसा वर्षेल । तेणे अर्जुन शांत होईल । मग पालवी ती फुटेल । ज्ञानरूपी ॥७९॥
कथा ती ऐकून । होईल मनाचे समाधान । मन ते एकाग्र करून । ऐका तुम्ही ॥८०॥

संजय उवाच

संजय धृतराष्ट्रा म्हणाला । अर्जुन जो शोकग्रस्त झालेला । काय म्हणाला कृष्णाला । ऐक आता ॥८१॥
तुम्ही देवा ऐका । मज जास्त आळवू नका । मनधरणी करू नका । माझी आता ॥८२॥
ऐसे वाक्य ऐकून । अर्जुना निराश पाहून । विस्मित झाला कृष्ण । मग रणांगणी ॥८३॥
कृष्णाने मनी विचार केला । हे काय झाले अर्जुनाला । काहीच कळत नाही याला । करावे काय ॥८४॥
यास समज कशी येईल । पुन्हा धैर्य कसे प्रकटेल । भ्रांती कशी ती जाईल । याची आता ॥८५॥
जैसे केल्यावर रोगाचे निदान । वैद्य देई औषधी अमृतासमान । तैसा तो भगवान । बोलेल आता ॥८६॥
दोन्ही सैन्यांच्या मध्यासी । विचार पडला श्रीकृष्णासी । कैसे काढावे अर्जुनासी । भ्रांतीतून ॥८७॥
काढण्या अर्जुनासी भ्रांतीतून । मग बोलला दटावून । जसे मातेचं रागावणं । पुत्राठायी ॥८८॥
जैसे औषधाचे कडवटपण । परि त्यासी अमृतासारखा गुण । होते जयाने कल्याण । रोग्याचे पहा ॥८९॥
वरी वरी दिसे रागवला । परि अंतरी करुणावला । मग वाक्य ते बोलला । भगवान कृष्ण ॥९०॥

भगवान उवाच

मग अर्जुनासी म्हणीतले । आज मी नवल देखिले । तुवा हे काय झाले । आज रणी ॥९१॥
स्वत:स शहाणा समजतोस । पण अज्ञान न सोडतोस । नीतीच्या त्या गप्पा मारतोस । शिकवू जाता ॥९२॥
जन्मांधा लागे पिसे । मग सैरावरा धावे जैसे । तुझे शहाणपण तैसे । दिसे मजला ॥९३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तू स्वत:स न जाणतोस । आणि कौरवांसाठी शोक करतोस । वाटतो विस्मय आम्हांस । बघ तयाचा ॥९४॥
तू सांग मज अर्जुना । निर्मिले तू का त्रिभुवना । अनादिच ही विश्व रचना । अकारण नाही ॥९५॥
येथे एकचि चैतन्य असणे । तयापासून विश्व होणे । वायफळ नसे हे बोलणे । जाण अर्जुना ॥९६॥
काय ते ऐसे जाहले । जन्ममृत्यू तू निर्मिले । प्रकटले ते नाशिले । तुझ्यामुळे कां ॥९७॥
तुझे भ्रांतीने भ्रमणे । कौरवासी युद्ध न करणे । काय ते टाळील मरणे । कौरवांचे ॥९८॥
काय तुवाच मारिता । होईल कौरवांची हत्या । ऐसा भ्रम तो चित्ता । येऊ न देसी ॥९९॥
अनादिसिद्ध हे आघवे । होत जात स्वभावे । तुला का दु:ख व्हावे । सांग मजला ॥१००॥
तू न काही जाणतोस । न चिंतावे ते चिंतितोस । वर शहाणपण शिकवतोस । तू मजला ॥१०१॥
जे विवेकवान असती । ते सुखदु:ख सम मानती । जन्ममरण दोन्ही भ्रांती । जाण अर्जुना ॥१०२॥
अर्जुना तू ऐक । सांगतो मन इंद्रियांचे कौतुक । भ्रांतीच ती सकळीक । भासते जे ॥१०३॥
असणे आणि नसणे । दोन्ही भ्रांतीच्या कारणे । दोहो पलीकडे जाणे । ते ज्ञान अर्जुना ॥१०४॥
हे जे उपजे आणि नाशे । ते मायावशे दिसे । येरवी वस्तू जी असे । ती अविनाशीच ॥१०५॥
वाऱ्याने पाणी हालले । ते तरंगाकार झाले । मग म्हणणे तरंग ते जन्मले । अज्ञान अर्जुना ॥१०६॥
वाऱ्याचे वाहणे थांबले । आणि पाणी स्थिर झाले । मग म्हणणे तरंग ते मेले । अज्ञानच की ॥१०७॥
एक असे शरीर । पण फरक होतसे वयाबरोबर । अर्जुना तू जाणकार । या सर्वांचा ॥१०८॥
प्रथम कुमार अवस्था असते । तारुण्य येता ती बदलते । पण शरीर कां नष्ट होते । बदलासवे ॥१०९॥
तैसे शरीर ते बदलते । पण चैतन्य स्थिर असते । जे चैतन्य आहे जाणते । ते चिरंतन ॥११०॥
येथे अज्ञानाचे हेच कारण । जे असती मनइंद्रियाधीन । तया चैतन्याचे ज्ञान । नाही नाही ॥१११॥
इंद्रिय विषय सेविती । आणि सुखदु:ख मानिती । या सुखदु:खाची उत्पत्ती । संस्काराकारणे ॥११२॥
या इंद्रियांच्या ठायी । सुख दु:ख दोन्ही नाही । जे सुखदु:ख भासे काही । ते संस्कार की ॥११३॥
देख शब्दांची ती व्याप्ती । निंदा आणि स्तुती । तेथे राग द्वेष उपजती । संस्काराकारणे ॥११४॥
मृदु आणि कठीण । दोन्ही संवेदनाचे ते गुण । त्या संवेदना कारण । भासे सुखदु:ख ॥११५॥
कुरूप आणि सुरेख । हे संवेदनांचे स्वरूप देख । जे उपजवी सुखदु:ख । मनाठायी ॥११६॥
सुगंध आणि दुर्गंध । हा संवेदनांचा भेद । वासाकारणे सुख-विषाद । संस्कारांकारणे ॥११७॥
चव चांगली वाईट । तो संवेदनांचा थाट । सुखदु:खाची लाट । संस्कारांकारणे ॥११८॥
जर संस्कारा अधीन होईजे । मग शीत उष्ण अनुभविजे । मग सुखीदु:खी जाणीजे । स्वत:स ॥११९॥
या संस्कारांवाचून काही । इंद्रियांस महत्त्व नाही । तादात्म्य संस्कारांचे ठायी । तुटू दे अर्जुना ॥१२०॥
या संस्कारांचे स्वरूप कैसे । बा मृगजळच ते तैसे । स्वप्नांचे भास जैसे । निद्राधीना ॥१२१॥
अनित्यता संस्कारांची जाणून । तयाशी तादात्म्य तोडून । तू हो आत्मवान । अर्जुना माझ्या ॥१२२॥
जयाचे संस्कारांशी तादात्म्य तुटले । तयाचे सुखदु:ख संपले । मग भवचक्र भंगले । तयांचे अर्जुना ॥१२३॥
तो ज्ञानी पार्था । ओळखावा सर्वथा । संस्कारांची ती कथा । संपली ज्याची ॥१२४॥
आता अर्जुना काही एक । सांगतो ते ऐक । जे संत ज्ञानी लोक । जाणती अंतरी ॥१२५॥
या विश्वामाजी गुप्त । चैतन्यच असे सर्वव्याप्त । तत्त्व ते जाणती संत । ठायीठायी ॥१२६॥
पाण्यात दूध जसे । एकत्र मिसळत असे । परि निवडुनी राजहंसे । वेगळे केले ॥१२७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे अग्नीत किडाळ । जाळोनिया चोखाळ । सोनार निवडती केवळ । सुवर्ण तैसे ॥१२८॥
तैसे धरून जाणिवेचे ठिकाण । करता निर्विकल्प निरीक्षण । मग नवनीत निर्वाण । प्रकटे अर्जुना ॥१२९॥
एकत्रित असता धान्य भूस । जर ते पाखडल्यास । शिल्लक रहाते धान्य रास । जैसी अर्जुना ॥१३०॥
तैसे मन इंद्रियासी तादात्म्य तुटता । द्वैत ते निरसता । एकत्व पावता आत्मतत्त्वा । ज्ञान होते ॥१३१॥
म्हणून अनित्याच्या ठायी । तयां तादात्म्य नाही । जाणले नित्य अनित्य दोघेही । अंतरंगी ज्याने ॥१३२॥
ऐसा सारासार विचार करता । भ्रांती ती ओसरता । द्वैत ते संपता । अद्वैत प्रकटे ॥१३३॥
तिन्ही लोक जे भासती । ते मनाचाच विस्तार असती । अद्वैती नामरुपाची वस्ती । नाही अर्जुना ॥१३४॥
जो असे सदा सर्वगत । जन्म आणि क्षयातीत । त्यासी केलीयाही घात । मरण नाही ॥१३५॥
आणि शरीरजात आघवे । हे नाशवंत स्वभावे । म्हणोनी तुवा झुंजावे । पंडुकुमारा ॥१३६॥
तुझ्याठायी देह अभिमान । तुज वाटे शरीर आपण । तुवा मारल्या कौरवा मरण । भ्रांती अर्जुना ॥१३७॥
अर्जुना तू अज्ञानी खरा । जर होशील जाणणारा । तू नव्हेस मारणारा । नि ते मर्त्य नसती ॥१३८॥
जैसे स्वप्नामाजी पाहता । वाटे स्वप्नाची सत्यता । पण जाग ती येता । काही नाही ॥१३९॥
अर्जुना तू अजाणता । तुज मनी आहे भ्रमता । कां शस्त्र सावलीस हाणता । रक्त येते कधी ॥१४०॥
भरला कुंभ उलंडला । त्यातील बिंब आकार नासला । परि सूर्य तो न संपला । तया सवे ॥१४१॥
जैसे मठी आकाश असते । ते मठाकार भासते । परि मठ भंगल्याते । आकाश अभंग ॥१४२॥
तैसा लोप होता शरीराचा । नाश न होतो स्वरूपाचा । भास तो मृत्यूचा । भ्रांती अर्जुना ॥१४३॥
वस्त्रे जुनी होता टाकतो । नि नवीन ते घालतो । तैसा देहांतराचा खेळ चालतो । चैतन्यी अर्जुना ॥१४४॥
हा अनादि नित्यसिद्ध । उपाधिरहित विशुद्ध । म्हणून शस्त्रास्त्र तया छेद । देऊ न शकती ॥१४५॥
तो प्रलयकाली न बुडे पाण्यात । अग्नी तया न जाळू शकत । नाही बा शोषू शकत । वायू तया ॥१४६॥
अर्जुना हा नित्य । अचल असे शाश्वत । सर्वत्र भरलेला सदोदित । परिपूर्ण की ॥१४७॥
तर्कास नसे हा समजत । इंद्रियास नसे तो उमजत । केवळ निर्विकल्प निरीक्षणात । भेट त्याची ॥१४८॥
हा सदा दुर्लभ मना । प्रकटवू शके न तया साधना । सीमारहित हा अर्जुना । पुरुषोत्तम ॥१४९॥
हा त्रिगुणविरहित । अनादि आणि अनंत । मन इंद्रियांच्या अतीत । सर्वव्यापी ॥१५०॥
हे आत्मतत्त्व जाणता । त्या सर्वात्मका अनुभवता । मग ही शोकाकुलता । नष्ट होई ॥१५१॥
हे जर न घडे जाणणे । आणि सर्वा नाशवंत मानणे । ते व्यर्थ शोक करणे । जाण अर्जुना ॥१५२॥
ऐसी उत्पत्ती स्थिती अंत । हे निरंतर असती नित्य । जैसा प्रवाह अव्याहत । गंगाजलाचा ॥१५३॥
वाफ बर्फ पाणी । या अवस्था पाण्याच्या तिन्ही । तैसी जिवांची रहाटणी । जगती या ॥१५४॥
या तिघांच्याही पार । ते आत्मतत्त्व अपार । चैतन्य जे सार । जाणीवस्वरूप ॥१५५॥
जाणून हे आघवे । तू दु:खरहित व्हावे । जन्ममरण हे स्वभावे । अखंडित ॥१५६॥
जर तुला अर्जुना । चैतन्य ते समजेना । सर्व जग हे पहा ना । जन्ममरणाधीन ॥१५७॥
म्हणून येथे काही । तुज शोकासी कारण नाही । जन्ममृत्यू ते पाही । अपरिहार्य की ॥१५८॥
उपजे ते नाशे । नाशले पुनरपि दिसे । हे रहाटघाडगे जैसे । पहा अखंडित ॥१५९॥
सूर्य उदय अस्त जैसे । आपोआप होत जात असे । हे जन्ममरण तैसे । अटळ अर्जुना ॥१६०॥
महाप्रलय समयी । त्रैलोक्यही नष्ट होई । म्हणून तू जन्म मरण पाही । अपरिहार्य ॥१६१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जर तुला हे समजले । मग शोक सारे सरले । तुजसी आहे का उमजले । सांग अर्जुना ॥१६२॥
येथे आणिकही एक पार्था । अस्तित्व ते जाणता । दु:खाचा तो राबता । संपून जाई ॥१६३॥
बघ प्राणी येथे समस्त । जन्माआधी अव्यक्त । मग होती ते व्यक्त । जन्म होता ॥१६४॥
येथे जे मरण पावती । तया प्राप्त होते पूर्वस्थिती । मग सदैव पुनरुक्ती । जन्ममरणाची ॥१६५॥
हे जन्ममरण जे भासे । ते निद्रिता स्वप्न जैसे । हे आकार तैसे । मायिक अर्जुना ॥१६६॥
वारा स्पर्शता पाण्यास । प्रकटे तरंगाचा भास । देता सोन्यासी आकार खास । अलंकार की ॥१६७॥
तैसे विश्व हे सकल । मायाकारणेच प्रकटलं । जैसे प्रकटती मेघपटल । आकाशी अर्जुना ॥१६८॥
मुळातच जे नोहे । त्यासाठी रडणे चूक आहे । बा चिरंतन चैतन्य आहे । ठायी ठायी ॥१६९॥
तहान लागता चैतन्याची । गोडी तुटते विषयांची । मग संगत संतांची । आवडे मना ॥१७०॥
संतसंग तो घडता । मनइंद्रियांसी तादात्म्य तुटता । स्वप्न सुषुप्तीत जागता । आत्मज्ञान ॥१७१॥
होता अंतरी निश्चल । जे प्राप्त न्याहाळता केवल । चैतन्यच मग विश्व सकल । तयासाठी ॥१७२॥
तयाचे गुणगान करणे । मग चित्ता उपरती होणे । तल्लीनता मग पावणे । निरंतर ॥१७३॥
जे संत शब्दी निवाले । आणि देहभाव सांडले । मग अंतरी अनुभवले । चैतन्य त्यांनी ॥१७४॥
जशा नद्या मोठ्या लहान । सागरी होती त्या लीन । तैसे आत्मतत्त्वा अनुभवून । मुक्त व्हावे ॥१७५॥
तैसी योगीयांची गती । चैतन्यी ते एकरूप होती । मग भवचक्राची पुनरावृत्ती । नाही तेथे ॥१७६॥
जे वसतसे सर्वदेही । जया जन्ममृत्यू नाही । तया विश्वात्मका तू पाही । अंतरंगी ॥१७७॥
स्वत:चेच स्वभावे । हे होत जात आघवे । तया सुखदु:ख का मानावे । आम्ही येथे ॥१७८॥
हे सर्व तुला पार्था । समजते ना तुझ्या चित्ता । करणे तो शोक सर्वथा । अयोग्य की ॥१७९॥
अजूनही न सावरले स्वत:स । बघ तू चिंतामग्न आहेस । बा विसरला स्वधर्मास । अर्जुना तू ॥१८०॥
का कौरव रणी मेले । वा तुवा मरण आले । किंवा युगचि हे बुडाले । आज येथे ॥१८१॥
येथे स्वधर्म एक आहे । जो सर्वथा त्याज्य नोहे । तुझे दयाळूपण हे । न तारेल तुजला ॥१८२॥
अर्जुना तुझे चित्त । जे जाहले द्रवीभूत । आहे बघ ते अनुचित । या युद्धसमयी ॥१८३॥
गाईचे दूध जरी झाले । तरी ते पथ्यासी न चाले । विष दुधाचे झाले । तापात देता ॥१८४॥
त्याग करता स्वधर्माचा । नाश होतो हिताचा । सोडून विचार करुणेचा । करावे युद्ध ॥१८५॥
वायांचि व्याकूळ कायी । आपुला निजधर्म पाही । जो आचारिता दोष नाही । अर्जुना तुला ॥१८६॥
जैसे सरळमार्गे चालता । अपाय न होय सर्वथा । दिवा घेऊन चालता । अडखळणे नाही ॥१८७॥
पहा तयापरी पार्था । स्वधर्म हा आचरता । सकळ कामनांची पूर्णता । सहज होय ॥१८८॥
म्हणून जाण अर्जुना । तुम्हा त्या क्षत्रियांना । हे धर्मयुद्ध करण्याविना । उपाय नाही ॥१८९॥
मोहासी त्या त्यागावे । जशास तसे व्हावे । रणी ते झुंजावे । निष्कामपणे ॥१९०॥
अर्जुना हे युद्ध आजचे । सुदैवच की तुमचे । कार्य ते स्वधर्माचे । लाभले रणी ॥१९१॥
या युद्धास काय म्हणावे । येणे स्वर्गसुख लाभावे । पुरुषत्वा ते प्रकटवावे । आता रणी ॥१९२॥
उठ तू आता सत्वर । कर युद्ध महाघोर । हे कीर्तीने मांडले स्वयंवर । तुझ्यासाठी ॥१९३॥
अर्जुना बहुत पुण्य करता । लाभते ऐसी युद्धता । सापडणे मार्गे अडखळता । चिंतामणी ॥१९४॥
जांभईसाठी मुख उघडावे । तयात अचानक अमृत पडावे । तैसे या युद्धास जाणावे । लाभप्रद ॥१९५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे हे युद्ध टाळणे । नि व्यर्थ शोक करणे । ते आपणच शत्रू होणे । आपले अर्जुना ॥१९६॥
पूर्वजांनी पुण्य मिळविले । ते तुवा घालविले । जर आज तू शस्त्र टाकले । रणागंणी ॥१९७॥
असती कीर्ती जाईल । सर्व जग शाप देईल । महादोष तुज चिकटतील । जाण अर्जुना ॥१९८॥
जैसी स्त्री पतिविण। सर्वत्र पावते अपमान । तैसे होईल तुझे जीवन । स्वधर्म त्यागता ॥१९९॥
रणी प्रेतांचे खच पडती । मग गिधाडे ते तोडती । तैसे महादोष लागती । स्वधर्म सांडता ॥२००॥
जर तू स्वधर्म सांडशील । मग पाप तुला लागेल । आणि अपकीर्ती ती होईल । कल्पांतापर्यंत ॥२०१॥
शहाण्याने तोपर्यंतच जगावे । जोपर्यंत अपकीर्ती न पावे । तुला कां वाटते जावे । रणातून ॥२०२॥
प्राप्त होऊन करुणेला । जर तू माघारी फिरला । मान्य न होईल ते शत्रूला । जाण अर्जुना ॥२०३॥
ते चहूबाजूने वेढतील । तुजवर बाण सोडतील । मग कामा न येईल । करुणा तुझी ॥२०४॥
ऐशा या प्राणसंकटातून । जरी गेलास तू सुटून । वाईटच ते जगणं । पहा मृत्यूहून ॥२०५॥
आणिक एक सांग मजला । तू युद्धास येथे आला । आणि परत तो निघाला । करुणेमुळे ॥२०६॥
तुझी ती दया करुणा । खरी वाटेल का वैऱ्यांना । सांग मला अर्जुना । आज येथे ॥२०७॥
ते म्हणतील गेला रे गेला । अर्जुन आम्हां भ्याला । ऐसा डाग जर लागला । चालेल का तुला ॥२०८॥
लोक प्रयत्न करतात । प्रसंगी प्राणही वेचतात । परि कीर्ती ती वाढवतात । प्राणही देऊन ॥२०९॥
कीर्ती तुज अनायासे । आयतीच मिळाली असे । अपार ती बा असे । गगनासम ॥२१०॥
जैसी कीर्ती नि:सीम । तुझ्याठायी ती निरूपम । तुझे गुण उत्तम । तिन्ही लोकी ॥२११॥
देशोदेशीचे भूपति । करतात तुझी स्तुती । जी ऐकून दचकती । यमादिक ॥२१२॥
ऐसी कीर्ती तुझी महान । जैसी गंगा ती पावन । ती कीर्ती ऐकोन योद्धेजन । घाबरती तुजला ॥२१३॥
पराक्रम तुझा अद्भुत । ऐकून हे समस्त । होती बघ विरक्त । वीर सारे ॥२१४॥
ऐकून सिंहाचे गर्जन । उडे हत्तींची गाळण । तैसा कौरवांना जाण । धाक तुझा ॥२१५॥
पर्वत तो वज्रास । सर्प तो गरुडास । तैसे कौरव अर्जुनास । घाबरती बा ॥२१६॥
तुझे थोरपण जाईल । हीनत्व ते येईल । जर युद्धी माघारी फिरशील । अर्जुना तू ॥२१७॥
कौरव तुवा न पळू देतील । धरून ते पकडतील । तुज ते निंदतील । कटू शब्दे ॥२१८॥
तव चित्त भरेल दु:खानं । त्यापेक्षा उत्तम ते लढणं । आणि जिंकून ते भोगणं । राज्यसुख ॥२१९॥
अथवा या रणांत । जर झालास तू हताहत । तर पावशील निश्चित । स्वर्गसुख ॥२२०॥
अर्जुना तू म्हणून । चिंता ती सोडून । घे हाती धनुष्यबाण । लढण्या अर्जुना ॥२२१॥
करता स्वधर्म आचरण । नाश पावती ते दुर्गुण । युद्ध पाप वाटणं । भ्रांती अर्जुना ॥२२२॥
काय नाव पाण्यात का बुडीजे । का मार्गी जाता अडखळीजे । जर चालणेही नेणिजे । तर तेही घडे ॥२२३॥
अमृतानेही येईल मरण । जर विष मिसळून केले सेवन । तैसे स्वधर्माच दूषित होणं । कामनाकारणे ॥२२४॥
बघ अर्जुना म्हणून । सर्व हेतू ते सांडून । निष्काम होऊन ते लढणं । पाप नाही ॥२२५॥
सुखदु:ख तू सम मानी । जय पराजय लाभ हानी । समबुद्धी ठेवता रणांगणी । पाप कैसे ॥२२६॥
युद्धी विजय का मिळेल । वा मरण बा येईल । चिंता सोडावी ती पुढील । युद्ध करता ॥२२७॥
स्वधर्म आचरणे उचित । काहीही घडो भविष्यात । सहन करणे ते निवांत । कल्याणकारी ॥२२८॥
ऐसे होता बघ मन । न घडे पापाची लागण । म्हणून निभ्रांत ते होऊन । कर युद्ध अर्जुना ॥२२९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हा ज्ञानमार्ग संक्षिप्त । सांगितला तुज एथ । आता कर्मयोग तो निश्चित । ऐक आता ॥२३०॥
मन बुद्धीयुक्त होता । निष्काम कर्म ते करता । मग कर्मबंध सर्वथा । होत नाही ॥२३१॥
जैसे वज्र कवच घालणे । मग शस्त्र घाव झेलणे । मग सहज ते जिंकणे । युद्धी अर्जुना ॥२३२॥
तैसे ऐहिक न संपते । परी मोक्षप्राप्ती होते । आचरता निष्काम कर्म ते । कल्याण अर्जुना ॥२३३॥
स्वधर्म तो आचरणे । कर्मी निष्काम ते रहाणे । जैसे मांत्रिकास न होणे । कधी भूतबाधा ॥२३४॥
ऐसी सुबुद्धी ती होता । निष्काम कर्म करता । न घडे कर्मबंधता । आपोआप ॥२३५॥
जया मनी न संचरे पुण्यपाप । अंतरी जे निष्कंप । तया गुणत्रयाचा लेप । लागेच ना ॥२३६॥
अर्जुना जर पुण्यवशे । हृदयी अल्पबुद्धी प्रकाशे । तरी पूर्णपणे नाशे । संसारभय ॥२३७॥
जैसी दिव्याची ज्योत धाकटी । परी बहू तेजाते प्रगटी । तैसे सद्‌बुद्धीही धाकुटी । म्हणू नये ॥२३८॥
पार्था जे बुद्धिवंत असतात । ते सुबुद्धीच इच्छितात । परि दुर्लभ या जगतात । सुबुद्धी अर्जुना ॥२३९॥
सर्वत्र ती दगडाची खाण । परि दुर्लभ परीस प्राप्त होणं । अमृताचा तो कण । भाग्यवंता ॥२४०॥
दुर्लभ ते बुद्धिवान । जया आत्मतत्त्वाची तहान । जैसे गंगेचं निरंतर वहाणं । सागरासाठी ॥२४१॥
जया आत्मतत्त्वावाचून । काहीच इच्छा नसणं । अर्जुना ते भाग्यवान । या जगती ॥२४२॥
येर दुसरी ती दुर्मति । जिया विकार ते आवडती । तेथे बघ रमती । जे अविचारी ॥२४३॥
म्हणोनी तया पार्था । स्वर्ग संसार नरकावस्था । आत्मसुख ते सर्वथा । त्यास नाही ॥२४४॥
वेद आधारे बोलती । केवळ कर्मकांड करती । ठेवून फलाची ती आसक्ती । भजती निरंतर ॥२४५॥
म्हणती संसारी जन्मावे । यज्ञादि कर्म करावे । मग स्वर्गसुख भोगावे । मनोहर ॥२४६॥
येथे यावाचुनी काही । दुसरे सुख नाही । ऐसे अर्जुना बोलती पाही । ती दुर्बद्धी ॥२४७॥
ऐसे कामनासक्त होऊन । इच्छेस्तव कर्मे आचरून । भोगती चित्त देऊन । भोग सर्वदा ॥२४८॥
कर्मकांड ती अनेक । विधि विविध कित्येक । दांभिक ते धार्मिक । कामनाकारणे ॥२४९॥
चूक ते कामनेत अडकणे । आणि स्वर्गसुख इच्छिणे । मग आत्मतत्त्वास मुकणे । आपोआप ॥२५०॥
पुण्याचा ढीग करणे । नि अग्नीत जाळून टाकणे । मिष्टान्नी विष कालवणे । ती कामना तैसी ॥२५१॥
दैवयोगे अमृतकुंभ मिळणे । तया लाथ मारून सांडणे । तैसे पूजाविधी इच्छांकारणे । व्यर्थ अर्जुना ॥२५२॥
श्रम करून पुण्य जोडणे । मग संसारसुख इच्छिणे । ऐसे नित्य जन्मणे आणि मरणे । अज्ञान अर्जुना ॥२५३॥
जैसे उत्तम स्वयंपाक करणे । नि बाजारी विकून टाकणे । परि स्वत: न सेवणे । ते पैशासाठी ॥२५४॥
वेदांचा कर्मपर अर्थ लावणे । इच्छाकामना मनी धरणे । ते दुर्बुद्धिचेच असणे । अज्ञानापायी ॥२५५॥
तिन्ही गुणांनी असती आवृत्त । चारही वेद निश्चित । आणि उपनिषदादि समस्त । सात्त्विक ते ॥२५६॥
वेद विषय रज तम गुणात्मक । जे वर्णिती यज्ञ कर्मादिक । जे केवळ स्वर्गसूचक । जाण पार्था ॥२५७॥
म्हणून अर्जुना तू जाण । कामनाच दु:खाचे कारण । नकोस होऊ देऊ मन । त्या कामनेच्या अधीन ॥२५८॥
तू त्रिगुणाते अव्हेरी । मी माझे हे न करी । मग आत्मसुख अंतरी । प्रकटते अर्जुना ॥२५९॥
वेदांनी खूप काही सांगितले । नाना भेद वर्णिले । जयात हित असे आपुले । घ्यावे तेच अर्जुना ॥२६०॥
बघ चौरस्ते उजेडात । स्पष्ट ते दिसतात । परि हिताचा मार्ग निवडीत । चालावे अर्जुना ॥२६१॥
सरोवरी उदंड उदक असणे । आपण गरजेपुरतेच घेणे । तैसे हिताचे तेच घेणे । वेदातून ॥२६२॥
तैसे जे ज्ञानी असती । ऐसा वेदांचा सार काढती । मग शाश्वत ती स्वीकारती । ब्रह्मयता ॥२६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणून ऐक पार्था । ऐसा संपूर्ण विचार करता । तुज उचित होय आता । स्वकर्म आचरणे ॥२६४॥
मी समस्त विचार केला । म्हणून तुज उपदेशिला । नको सोडू विहित कर्माला । अर्जुना तू ॥२६५॥
कर्मफलाची इच्छा न करणे । विहित कर्म न त्यागणे । स्वकर्मी रत असणे । कल्याण अर्जुना ॥२६६॥
तू योग युक्त होऊन । फलेच्छा ती त्यागून । समत्वी चित्त ठेवून । कर कर्म अर्जुना ॥२६७॥
एखादे कर्म करावे । आणि ते सिद्धीस ते जावे । परि मनी सुख न मानावे । कधी अर्जुना ॥२६८॥
आणि जर काही कारणाने । कर्माचे सिद्ध न होणे । तरी मनी दु:ख न मानणे । अर्जुना तू ॥२६९॥
कर्म सिद्धीस ते जावो । वा निष्फल ते होवो । दोही स्थिती समत्व राहो । मनबुद्धीचे ॥२७०॥
देख जे जे कर्म करावे । ते ईश्वरास अर्पावे । आपण सुखदु:खातीत व्हावे । तो योग अर्जुना ॥२७१॥
जे ज्ञानी जन असतात । ते ऐसेच कर्म करतात । आणि आत्मतत्त्वात रहातात । अखंडित ॥२७२॥
अर्जुना समत्व चित्ताचे । तेच सार जाण योगाचे । विसर्जन होता मनविचारांचे । योग घडे ॥२७३॥
ऐसे बुद्धीयोगाचे आचरण । तेचि असे कल्याण । कर कर्मयोगाचे आचरण । निष्काम होऊन ॥२७४॥
ऐसे कर्म ते आचरणे । मग योगयुक्त होणे । कर्मात कर्माचे संपणे । ते रहस्य अर्जुना ॥२७५॥
म्हणून कर्मयोग तू आचर । मनसमत्वात हो स्थिर । कामनांचा होता अव्हेर । प्रकटे योग ॥२७६॥
ऐसा बुद्धियोग जाणता । तयात पारंगत होता । सांडता ती पापपुण्यता । योग घडे ॥२७७॥
ऐसे कर्म जे करतात । परि कर्मफल न इच्छितात । ते भवचक्रातून सुटतात । आपोआप ॥२७८॥
ऐसे जे निरामय होत । ते परम पद पावतात । जन्ममरणातून सुटतात । योग घडता ॥२७९॥
या रहस्यास जर जाणशील । मोहास या जर सांडशील । मग योगयुक्त होशील । समत्व साधता ॥२८०॥
मग निष्कलंक ते गहन । उपजेल बघ आत्मज्ञान । नि:स्पृह होईल मग मन । अर्जुना तुझे ॥२८१॥
मग आणखी काही मिळवावे । अजून काही जाणावे । जे मनाकारणे आघवे । ते संपे अर्जुना ॥२८२॥
मन इंद्रियांच्या संगती । भ्रष्ट होती जी मती । स्थिर होईल आता ती । योग घडता ॥२८३॥
मन निश्चल ते होता । सकल अनुभव संपता । आत्मतत्त्व प्रकटता । घडे योग ॥२८४॥

अर्जुन उवाच

अर्जुन म्हणे देवाला । तुझा उपदेश मी ऐकला । आता विचारु दे मला । शंका माझी ॥२८५॥
मग अर्जुना कृष्ण म्हणे । जे काही आहे तुला विचारणे । ते विचार निर्धास्तपणे । आता तू ॥२८६॥
ऐकून या बोलास । अर्जुन म्हणाला श्रीकृष्णास । कसे ओळखावे स्थितप्रज्ञास । सांग मजला ॥२८७॥
जया स्थितप्रज्ञ म्हणतात । तो कोणत्या लक्षणांनी युक्त । कैसा वावरे तो समाधीत । अखंडित ॥२८८॥
तो राहे कशा स्थितीत । वागे कैसा व्यवहारात । कोणकोणत्या गुणांनी युक्त । तो भगवंता ॥२८९॥
तेव्हा परब्रह्मचा अवतार । षड्विकारांच्या जो पार । काय बोलला तो परमेश्वर । ऐका आता ॥२९०॥

श्री भगवान उवाच

श्रीकृष्ण म्हणे अर्जुनासी । जी कामना असे मानसी । तिच्यामुळे अंतरणे स्वसुखासी । घडे अर्जुना ॥२९१॥
कामनाकारणे होतसे घात । पडता मनइंद्रियांच्या नादात । होती जन ते पतित । जे इच्छाधीन ॥२९२॥
सर्व कामना त्या विरता । प्रकटते आत्मसंतोषता । तीच होय स्थितप्रज्ञता । जाण अर्जुना ॥२९३॥
जरी जाहली दु:खप्राप्ती । उद्वेग न ये तया चित्ती । सुखाचीही आसक्ती । नसे त्याला ॥२९४॥
अर्जुना तयाच्या ठायी । कामक्रोध ते नाही । भयाचे तर नावही । नाही तेथे ॥२९५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

सर्व कामना त्या निरसता । मन बुद्धि ती स्थिर होता । शरीर मनाच्या पार जाता । घडे योग ॥२९६॥
सर्वत्र समबुद्धी तयाची । भूमिका जैसी चंद्राची । सारखीच उधळण प्रकाशाची । अधम-उत्तमावर ॥२९७॥
ऐसी अखंड ती समता । सर्वभूतमात्री सदयता । विकल्प नच ये चित्ता । कवणे वेळी ॥२९८॥
मनाप्रमाणे ते होता । हर्ष न तयाच्या चित्ता । मनाविरुद्ध ते घडता । न विषाद त्यासी ॥२९९॥
ऐसा हर्षशोकरहित । अखंड राहे जो आत्मबोधात । जाण तो प्रज्ञायुक्त । अर्जुना तू ॥३००॥
त्या कासवाच्या प्रमाणे । मनी येता अवयव पसरणे । वा तरी स्वेच्छेने आवरणे । अवयव ते ॥३०१॥
ऐसे इंद्रिये ताब्यात असणे । इंद्रियांचे बरहुकूम ते वर्तणे । ते प्रज्ञेचे स्थिर होणे । जाण अर्जुना ॥३०२॥
अर्जुना आणिकही एक । सांगतो बघ कौतुक । विषय त्यागती साधक । मनोनिर्धारे ॥३०३॥
नाककानादि इंद्रिय आवरती । परि जिभेस सैल सोडती । काहीही खाती पिती । चवीकारणे ॥३०४॥
जसे वरवर पान खुडणे । आणि मुळांना पाणी घालणे । मग झाड ते मरणे । शक्य नाही ॥३०५॥
मग पाण्याचे कारणे । झाडाचे जोरात वाढणे । तैसे विषय घट्ट होणे । जिभेठायी ॥३०६॥
इतर इंद्रियांचे विषय तुटणे । परि जिभेस न आवरणे । अन्नपाणी खाणेपिणे । अनिवार्य की ॥३०७॥
अर्जुना आत्मतत्त्व प्रकटता । परब्रह्म ते अनुभवता । होई जीभ नियंत्रित स्वभावता । आपोआप ॥३०८॥
ऐसे शरीर मनाशी तादात्म्य तुटणे । मी माझेपण संपणे । अहं ब्रह्मास्मि अनुभवा येणे । ज्ञान अर्जुना ॥३०९॥
एरवी तरी अर्जुना । कठीण आवरणे या इंद्रियांना । कोणतीही ती साधना । न टिके इंद्रियांपुढे ॥३१०॥
जे साधक साधन अवलंबतात । यम नियम पाळतात । भोग विषय टाळतात । निर्धाराने ॥३११॥
तयांचे कासावीस जिणे । या बलवान इंद्रियांकारणे । जैसे मांत्रिका हडळीनेच झपाटणे । उतरवू जाता ॥३१२॥
आवरता विषय ऐसे । ते प्रकटती ऋद्धिसिद्धीचेनी मिषे । ऐसे विषयभोगाचे फासे । बलवान अर्जुना ॥३१३॥
ऋद्धिसिद्धीत त्या अडकता । स्वउद्धारास विसरता । मग ती ब्रह्ममयता । प्रकटणे नाही ॥३१४॥
म्हणून ऐक पार्था । जाणून विषय इंद्रियांची गाथा । तयांशी तादात्म्य तुटता । ज्ञान होते ॥३१५॥
ऐसे तादात्म्य तुटणे । मग घडे योगाचे प्रकटणे । तेच बा ब्रह्ममय होणे । अर्जुना माझ्या ॥३१६॥
ऐसा जो आत्मबोधयुक्त । आत्मतत्त्वी स्थिर सतत । असूनही शरीर मनात । मुक्त तो ॥३१७॥
शरीराने विषय त्यागणे । परि मनी विषयांचे चिंतणे । मग भवचक्राचे चालणे । अव्याहत ॥३१८॥
करता विष थेंबभर सेवन । मग अनिवार्य ते मरण । तैसे इंद्रियविषयांचे स्मरण । घातकी अर्जुना ॥३१९॥
मनी विषय चिंतता । वाढते ती कामुकता । मग घडे व्याभिचारता । आपोआप ॥३२०॥
मनी विषय चिंतता । विरक्तास ही येई आसक्तता । तेथे प्रकटे कामुकता । विषयांकारणे ॥३२१॥
जेथे काम प्रकटला । तेथे क्रोध उपजला । मग संमोहही आला । आपोआप ॥३२२॥
मग संमोहाचे कारणे । विवेकाचे ते संपणे । जैसे ज्योतीचे ते विझणे । वादळाकारणे ॥३२३॥
घडता सूर्याचे मावळणे । मग अंधाराचेच प्रकटणे । तैसे अज्ञानाने घेरणे । विवेक संपता ॥३२४॥
अज्ञान ते प्रकटता । प्रकटते बुद्धिची भ्रष्टता । बुद्धी भ्रष्ट ती होता । सर्वनाश ॥३२५॥
जन्मांध पळू जाता । वाईटच तयाची अवस्था । तैसी प्रकटते व्याकुळता । बुद्धिहीना ठायी ॥३२६॥
ऐसी बुद्धी भ्रष्ट होणे । या अविवेका कारणे । मग तेथे ज्ञानाचे संपणे । आपोआप ॥३२७॥
ज्ञानाचे ते संपणे । जैसे प्राणाने शरीर सोडणे । ते जिवंतपणी मरण भोगणे । सर्वकाळ ॥३२८॥
म्हणून ऐक अर्जुना । जैसी ठिणगी पडता इंधना । मग जाळू शके ती त्रिभुवना । सहजच ॥३२९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तैसे विषयांचे चिंतन । करीत असे जे मन । मग तयाचे पतन । निश्चित अर्जुना ॥३३०॥
म्हणून विषय हे आघवे । मनातून ते सांडावे । मग आसक्ती द्वेष स्वभावे । संपून जाती ॥३३१॥
आसक्ती द्वेष संपता । इंद्रियाठायी वावरता । आता विषय इंद्रियांची बाधकता । तेथे नाही ॥३३२॥
जैसा सूर्य आकाशात असतो । तो किरणांनी जगास स्पर्शतो । परि तया संगदोष तो । लागेच ना ॥३३३॥
तैसा इंद्रियासी उदासीन । आत्मतत्त्वात रममाण । होऊन कामक्रोध विहीन । स्थितप्रज्ञ राहे ॥३३४॥
विषयांच्या त्या कारणे । विकाराचे न उपजणे । मग आत्मतत्त्वी ते वर्तणे । सर्वकाळ ॥३३५॥
जर पाणी पाण्यास बुडवेल । अग्नी अग्नीस जाळील । तरच विषय विकारतील । स्थितप्रज्ञा ॥३३६॥
ऐसा विश्वरूप केवळ । होऊन तो निखळ । जयाची प्रज्ञा अचल । तो स्थितप्रज्ञ ॥३३७॥
अखंडित ती प्रसन्नता । असे जयाच्या चित्ता । भविष्याच्या त्या चिंता । नच तयाठायी ॥३३८॥
जयाच्या त्या जठरात । अमृत असे स्त्रवत । तहान भुकेचा वात । नाही त्याला ॥३३९॥
जयाचे हृदय प्रसन्न । तया दु:ख कुठून । ऐसा तो आत्मवान । ईश्वरस्वरूप ॥३४०॥
नसता वाऱ्याचा झोत । मग अकंप दिव्याची ज्योत । तैसा स्थिर तो स्वरूपात । योगी अर्जुना ॥३४१॥
स्वरूपी लीन होण्याची युक्ती । नाही जयांचे चित्ती । तया विषय इंद्रिय बांधती । त्रिगुणाधारे ॥३४२॥
तया स्थिर बुद्धि पार्था । कधीच नसे सर्वथा । आणि मन स्थिरतेची आस्था । तीही न उपजे ॥३४३॥
स्थिर नसता मन । मग कैसे शांतीचे प्रकटन । सदैव अशांतीची भणभण । तया मनी ॥३४४॥
शांति नसता मनात । सुख दूर असे जात । ऐशा पाप्याच्या अंतरात । मोक्ष कैसा ॥३४५॥
बीज अग्नीत भाजले । जर भूमीत ते अंकुरिले । तरच सुख प्राप्त झाले । पापीयासी ॥३४६॥
ऐसे चंचलपण मनाचे । तेच कारण दु:खाचे । म्हणून मन इंद्रियांचे । होवो निरसन ॥३४७॥
इंद्रियांच्या नादी लागता । इंद्रियभोगी अडकता । मग दु:खाचीच वार्ता । तयाच्या मनी ॥३४८॥
जैसी नाव किनाऱ्या लागली । परि वादळात सापडली । मग पहा ती बुडाली । सागरात ॥३४९॥
तैसे जे इंद्रिय न आवरती । इंद्रिय भोगात अडकती । मग दु:खाची प्राप्ती । आपोआप ॥३५०॥
म्हणून मन समजेतून । जर मनइंद्रिय झाली स्वाधीन । तोच अर्जुना भाग्यवान । या जगती ॥३५१॥
जैसे पहा कासव ते । प्रसन्न होता अवयव पसरते । आणि स्वेच्छेनेच आवरते । अवयवांना ॥३५२॥
तैसे इंद्रिय स्वाधीन होणे । जे सांगितले ते करणे । मग घडे प्रज्ञेत स्थिरावणे । आपोआप ॥३५३॥
आणिक एक गहन । पूर्णत्वाचे चिन्ह सांगीन । ऐक लक्ष देऊन । अर्जुना आता ॥३५४॥
जे प्राणिमात्र न जाणती । तेथे तयाची वस्ती । प्राणी इंद्रियभोगी अडकती । तेथे हा विरक्त ॥३५५॥
ऐसे इंद्रियांशी तादात्म्य तुटता । मनातीत ते होता । त्या आत्मतत्त्वाचा जाणता । तो स्थितप्रज्ञ ॥३५६॥
आणिक एक लक्षण । सांगतो घे ऐकून । जे सागराचे गंभीरपण । तैसे मन याचे ॥३५७॥
जरी नद्यांचे ओघ समस्त । समुद्रा येऊन असती मिळत । तरी सागर राही सीमेत । सदैव अर्जुना ॥३५८॥
उन्हाळा तो येता । सर्व नद्या आटून जाता । परि समुद्राची ती परिपूर्णता । भंगेच ना ॥३५९॥
ऋद्धिसिद्धी होता प्राप्त । नसे तो हुरळून जात । आणि जरी नाही मिळाल्यात । तरी दु:ख नाही ॥३६०॥
सांग सूर्याच्या घरी । प्रकाश वातीचा काय करी । तेथे वात न लावली तरी । काय अंधार होतो ॥३६१॥
तैसे ऋध्दिसिध्दी असल्या तरी । वा त्या गेल्या तरी । जो आत्मवान अंतरी । तया फरक नाही ॥३६२॥
जयाच्या वैभवाकारणे । इंद्रासही पडे लाजणे । तो पर्णकुटी कारणे । लोभवेच ना ॥३६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जया नाही अमृताची आसक्ती। ते कांजी का प्राशन करती। आत्मतत्त्वी जे रहाती। ते निष्काम ॥३६४॥
पार्था नवल हे पाही। जेथे स्वर्गसुखा किंमत नाही। तेथे ऋद्धिसिद्धीची अपेक्षाही। नसेच की ॥३६५॥
ऐसा आत्मबोध होता। परमानंदी रमता। तिच बा स्थितप्रज्ञता। जाण अर्जुना ॥३६६॥
ऐसा अहंकार संपवून। निष्काम ते होऊन। राहे विश्व होऊन। विश्वामाजी ॥३६७॥
अंतरी ब्रह्मस्थिती अनुभवता। निष्काम ते होता। परब्रह्मपदी पावता। मोक्ष घडे ॥३६८॥
चैतन्यी एकरूप होता। संपे जन्ममरणाची व्यथा। देहांतीही व्याकुळता। नसे तेथे ॥३६९॥
ऐसी ही स्थिती। प्रेमे सांगितली श्रीपती। अमुप ती ब्रह्मस्थिती। अर्जुनाला ॥३७०॥
ऐसे कृष्ण बोल ऐकून। अर्जुनाने केले चिंतन। याची ही शिकवण। पथ्यावर माझ्या ॥३७१॥
निष्कामता सांगून। केले कर्माचेच खंडन। मग मी युद्ध करणं। त्याज्य आता ॥३७२॥
अर्थ अर्जुनाने ऐसा काढला। चित्ती हरखून गेला। आता प्रश्न करील भला। श्रीकृष्णाते ॥३७३॥
तो प्रसंग बहारदार। सर्व धर्मांचे आगर। विवेक अमृताचा सागर। अमर्यादित ॥३७४॥
आता सर्वज्ञ जो भगवंत। निरूपण करेल श्री अनंत। सांगतो त्या ज्ञानाचा वृत्तांत। म्हणे ज्ञानदेव ॥३७५॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगोनाम द्वितीयोऽध्याय: ॥२॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

---

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान ®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्‌गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०